**ePaper** विधानसभा अध्यक्ष कुणाला अपात्र करतात याची वाट पाहतोय : परब



| वर्ष - 7 | अंक - 240 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 9 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- रोहित-विराट कोहलीचं कमबॅक!
- अन्नपूर्णी सिनेमा वादाच्या भोवऱ्यात!
- शेख हसीना यांचा चौथ्यांदा विजय
- मी कारसेवक म्हणून अयोध्येत होतो

# नदी सुधार प्रकल्पाचे 'गाजर'

## » घोषणेची पोकळ हवा? : प्रशासकीय पातळीवर कार्यवाही 'शून्य'

। पिंपरी । महाईन्यूज । ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्पाबाबत नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये सकारात्मक चर्चा झाली. लक्षवेधी माध्यमातून शहरातील आमदार महेश लांडगे, आमदार अश्विनी जगताप यांनी नदी प्रदूषणाचा हा मुद्दा राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिला.**



त्यावर राज्याचे कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी जोरदार घोषणा करीत, पिंपरी-चिंचवडकरांसह पर्यावरण प्रेमींना अक्षरश: गाजर दाखवले आहे. विधिमंडळ सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, राज्य शासनाकडे प्रलंबित असलेले पर्यावरण विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र, विविध योजनांमधून निधी उपलब्ध करणे आणि पीसीएमसी व पीएमआरडीच्या दोन्ही 'डीपीआर' ला केंद्र सरकारची मंजुरी मिळवणेकामी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी मागणी शहरातील विधानसभा सदस्यांनी केली. त्यावर महिनाभरात काहीही कार्यवाही झालेली नाही. दरम्यान, आळंदी येथील इंद्रायणी नदीतील पाण्यावर जलप्रदूषणामुळे पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात तवंग (फेस) आले आहेत. मागील आठ दिवसांपासून नदीतील पाण्यावर मोठ्या प्रमाणात तवंग येत आहेत. त्यामुळे श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या इंद्रायणीचे पावित्र्य धोक्यात आले आहे. पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक वसाहती, इंद्रायणी नदीकाठच्या कारखान्यातील रसायनयुक्त पाणी, गावांमधील मैलायुक्त पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट इंद्रायणी नदी पात्रात सोडले जाते. मैलायुक्त पाणी हे इंद्रायणी नदीला प्रदूषित करत आहे. पिंपरी महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), जिल्हा प्रशासन, ग्रामस्थांच्या पुढाकारातून नदी काठच्या गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्याचे नियोजन केले आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून सातत्याने आळंदीत पाण्यावर तवंग येत आहेत. एखाद्या अती थंड प्रदेशात ज्याप्रमाणे नदीवर बर्फाची चादर असते तशीच अवस्था इंद्रायणी नदीची झाली आहे.

### कॅबिनेट मंत्र्यांच्या घोषणेचे काय झाले

» नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे, नदी पात्रालगत असलेले बेकायदा भंगार दुकाने, केमिकलमिश्रीत सांडपाणी नदीत सोडणाऱ्या कंपन्या आणि राडारोडा टाकणाऱ्या नागरिकांवर कारवाई करण्याबाबत मोहीम प्राधान्याने हाती घेण्याची आवश्यकता आहे. मात्र, प्रशासनाकडून काहीही हालचाल दिसत नाही. इंद्रायणी नदी पात्रालगत तळवडे, दिघी, डुडुळगाव, चिखली, भोसरी (सीएमई) आणि पवना नदी पात्रालगत प्रस्तावित असलेले किवळे, मामुर्डी, वाकड, रावेत, पुनावळे, ताथवडे, या गावांमध्ये प्रस्तावित असलेले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प हाती घेण्याचे आदेश दिले आहेत. याकडेही महिन्याभरात कार्यवाही दिसत नाही. मग, नदी प्रदूषण आणि नदी सुधार प्रकल्पाबाबत राज्य सरकार आणि प्रशासन सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यांत धुळफेक करीत आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# भारतात "M फॉर मदर' तसे 'M फॉर मोदी"...!

## » सुधीर मुनगंटीवार : मोदी देशाचं कधीच नुकसान होऊ देणार नाहीत!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाने सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक या चारही क्षेत्रामध्ये प्रगती बघितली आहे. संपूर्ण जगामध्ये मोदींच्या कार्य कर्तुत्वाचा गौरव होत आहे. एक न्यू इंडियाचा संकल्प घेऊन ते काम करत आहे.**

आणि हे खरं आहे जसे 'M FOR मदर' ती आई आपल्या मुलाचे नुकसान कधीच होऊन देत नाही, तसेच 'M FOR मोदीजी' आपल्या देशाचे कधीच नुकसान होऊ देणार नाहीत असा विश्वास राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. चिंचवडमध्ये कलारंग सांस्कृतीक कलासंस्थाचे वतीने आयोजित 'पंतप्रधान ते प्रधानसेवक' नरेंद्र मोदी यांच्यासंदर्भात मराठी वृत्तपत्रातील छायाचित्र व माहितीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला सुधीर मुनगंटीवार यांनी भेट दिली, यावेळी ते बोलत होते. सुधीर मुनगंटीवार यांनी तब्बल एक तास वेळ देऊन हे प्रदर्शन पूर्णपणे पाहिले. कलारंग संस्थेचे अध्यक्ष व मुख्य संयोजक अमित गोरखे व ज्यांनी १० वर्ष प्रत्येक बातमी संकलीत केली ते संयोजक नितीन चिलवंत यांचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कौतुकास्पर आभार मानले. यावेळी आमदार उमा खापरे, शहराध्यक्ष शंकर जगताप, सदाशिव खाडे, माऊली थोरात, कैलास कुटे, राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, शीतल शिंदे, गणेश लंगोटे, मनीषा शिंदे, निलेश अष्टेकर, राजू बाबर, मदन गोयल आदी मान्यवर उपस्थित होते.



### मोदींचे कार्य 'न्यू इंडिया' संकल्प...

» सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, अतिशय उत्तम असे हे प्रदर्शन आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये या देशामध्ये सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक,आर्थिक या चारही क्षेत्रामध्ये देशाने प्रगती बघितली आहे. जगामध्ये मोदीजींच्या कार्य कर्तुत्वाचा गौरव होत आहे. ५ ट्रिलियन डॉलर इकॉनोमीचा जो संकल्प आहे आणि त्या संकल्पासाठी होणारा प्रयत्न. या प्रयत्नाची माहिती या प्रदर्शनातून माध्यमातून सर्वसामान्य जनतेला पोहोचवण्याचे कार्य या प्रदर्शनातून केले आहे. ते अभिनंदनीय आणि कौतुकास्पद आहे. एक न्यू इंडियाचा संकल्प घेऊन मोदीजी काम करत आहे.

# अजितदादाच आता ज्येष्ठ नागरिक

## » 84 व्या वर्षीही शरद पवार जिद्दीने लढत आहेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील पाणी प्रश्न सरकार, भ्रष्ट जुमला पार्टी, नगरविकास खाते व सिंचन विभागाने सोडवला पाहिजे, एक नागरिक आणि लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी हे केलं पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सातत्याने शरद पवार यांचे वय काढले जाते, त्यावर सुप्रिया सुळेंनी भाष्य केले आहे. "८४ व्या वर्षीही शरद पवार जिद्दीने लढत आहेत.**

त्यांचा एक उज्वल कार्यकाळ आहे. त्यांच्या करिअर ड्राफ्टवर बोलायला मी खूप लहान आहे", असे सुळे यांनी म्हटले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार रोहित पवार यांना 'बच्चा' म्हटले होते. "तो अजून इतका मोठा झाला नाही, रोहित पवार अजून बच्चा आहे", असे अजित पवार यांनी म्हटले होते. त्यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, "अजितदादांच्या वयाच्या मानाने रोहित पवार अजून बच्चा आहेच. कारण अजितदादाच आता सिनिअर सिटिझन आहेत. दादा ६५ वर्षांचे आहेत. ते माझ्यापेक्षा १० वर्षांनी मोठे आहेत. संविधानात वयाची अट नाही. त्यामुळे अजितदादांनी कधी निवृत्ती घ्यावी हा त्यांचा वैयक्तिक विषय आहे. अजितदादा हे काकाच्या अधिकाराने रोहित पवार यांना बच्चा म्हणाले. त्यामुळे तो अधिकार त्यांना आहे. पण रोहितच्या वयात शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते." दरम्यान, अजित पवार यांच्याकडून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटावर आक्रमकपणे टीका होत असताना त्याला प्रत्युत्तर दिले जात नाही, त्यामुळे पवार कुटुंब एकत्र असल्यासारखं वाटतं, असा प्रश्न सुप्रिया सुळेंना पत्रकारांनी विचारला. त्यावर "मी राजकारणात



आरेला कारे करायला आले नाही. मी यशवंतराव चव्हाणांच्या कारकिर्दीत वाढलेली एक कार्यकर्ता आहे. आरेला कारे म्हणणं कधीकधी सोपं असतं पण शांत बसून सहन करायला जास्त ताकद लागते", अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली." काम करण्याच्या शैलीबाबत मीही १६ तास काम करते तसेच पारदर्शक काम करते, असे देखील त्या म्हणाल्या. "वाद झाले असतील तर कोणताही तिढा शरद पवार सोडवू शकतील. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ घेऊन कसं बोलायचं याचे आदर्श शरद पवार आहेत. मग ते वाद कुटुंबातील असो, पक्षातील असो किंवा वाटाघाटी करण्यासंदर्भात वाद असतील. सरकारमध्ये असताना पवारांवर ही जबाबदारी टाकली जायची. त्यामुळे मला याबाबत काही वाटत नाही", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, "महिन्याभरात आचारसंहिता लागेल. त्यामुळे सगळेच इच्छुक आहेत. आज प्रत्येक आघाडी इलेक्शन मूडमध्ये आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत पुढच्या आठ दहा दिवसांत होईल. आमचे प्रवक्ते याबाबत जाहीर सांगतील. दरम्यान, दक्षिण मुंबईत अरविंद सावंत खासदार आहेत. ईशान्य मुंबईतून भाजपाचे मनोज कोटक खासदार आहेत. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात ठाकरे गट विरुद्ध काँग्रेस यांच्यात वाद सुरू आहे. तर ईशान्य मुंबईबाबतही तिन्ही पक्ष आग्रही आहेत. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातून कोणाला उमेदवारी मिळतेय हे पाहावं लागणार आहे. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघाची जागा कायम राखण्यासाठी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गट आणि खासदार अरविंद सावंत यांच्या समोर मोठे आव्हान असेल. त्यातच महाविकास आघाडीत काँग्रेसने मिलिंद देवरा यांच्यासाठी या जागेवर दावा केल्याने विरोधी आघाडीत एकवाक्यता दिसत नाही. दुसरीकडे, भाजपमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनाही लोकसभेचे वेध लागल्याने भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळते याची उत्सुकता आहे.आज प्रत्येक आघाडी इलेक्शन मूडमध्ये आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत पुढच्या आठ दहा दिवसांत होईल. पुण्यातील पाणी प्रश्न सरकार, भ्रष्ट जुमला पार्टी, नगरविकास खाते व सिंचन विभागाने सोडवला पाहिजे, एक नागरिक आणि लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी हे केलं पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून सातत्याने शरद पवार यांचे वय काढले जाते, त्यावर सुप्रिया सुळेंनी भाष्य केले आहे. "८४ व्या वर्षीही शरद पवार जिद्दीने लढत आहेत.

### आरेला कारे म्हणणं कधीकधी सोपं

» अजितदादा हे काकाच्या अधिकाराने रोहित पवार यांना बच्चा म्हणाले. त्यामुळे तो अधिकार त्यांना आहे. पण रोहितच्या वयात शरद पवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते." यांच्याकडून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटावर आक्रमकपणे टीका होत असताना त्याला प्रत्युत्तर दिले जात नाही, त्यामुळे पवार कुटुंब एकत्र असल्यासारखं वाटतं, असा प्रश्न सुप्रिया सुळेंना पत्रकारांनी विचारला. त्यावर "मी राजकारणात आरेला कारे करायला आले नाही. मी यशवंतराव चव्हाणांच्या कारकिर्दीत वाढलेली एक कार्यकर्ता आहे. आरेला कारे म्हणणं कधीकधी सोपं असतं पण शांत बसून सहन करायला जास्त ताकद लागते

# स्वाती मोहोळ यांनी घेतली देवेंद्र फडणवीसांची भेट

## » स्वाती मोहोळ यांनी गेल्या वर्षी केला होता भाजपमध्ये प्रवेश

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कुख्यात डॉन शरद मोहोळच्या (SHARAD MOHOL) पत्नी स्वाती मोहोळ (SWATI MOHOL) यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADANVIS) यांची भेट घेतली. कुख्यात डॉन शरद मोहोळ यांची दोन दिवसांपूर्वी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर आता स्वाती मोहोळ यांनी फडणवीसांची भेट घेतली. स्वाती मोहोळ या पुणे भाजपच्या पदाधिकारी आहेत.**

शरद मोहोळ यांच्या खुन्यांवर लवकरात लवकर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केल्याची माहिती आहे. शरद मोहोळची पत्नी स्वाती मोहोळ या भाजपच्या पुणे शहर महिला आघाडीच्या सरचिटणीस आहेत. स्वाती मोहोळ यांनी राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत एप्रिल 2023 मध्ये भाजपमध्ये प्रवेश केला होता. स्वाती मोहोळ यांच्या भाजप पक्ष प्रवेशानंतर शरद मोहोळ राजकारणात एन्ट्री करणार अशीही चर्चा होती. पण त्या आधीच त्याची हत्या करण्यात आली. शरद मोहोळवर गोळीबार करणारे मारेकऱ्यांनी साताऱ्याच्या दिशेने वाहनातून पळायचं ठरवल होतं.





मात्र त्यांच्या गाड्यांचे नंबर ट्रेस करून पुणे पोलिसांनी लागलीच त्यांचा पाठलाग सुरु केला आणि शिरवळ जवळ पाठलाग करून आठ जणांना अटक केली. त्यांच्याकडून तीन पिस्तुले जप्त करण्यात आली आहेत. या आठ आरोपींमध्ये या दोन वकिलांचा देखील सहभाग आहे. आरोपींना पळून जाण्यास वकिलांनी मदत केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. शरद मोहोळने शुक्रवारी त्याच्या पत्नीसोबत वाढदिवस साजरा केला. लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. कुख्यात गुंड शरद मोहोळ हत्येचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे.

यामध्ये स्पष्ट दिसत आहे की, शरद मोहोळसोबत सावलीप्रमाणे चालणाऱ्या त्याच्या साथीदारांनीच त्याच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. 24 तास सोबत असणाऱ्या अंगरक्षक बनून सुरक्षा करणाऱ्यांनीच शरद मोहोळचा घात केला. साहील पोळेकर, विठ्ठल गांडले, नितीन कानगुडे हे तिघेही मोहोळसोबत सावलीसारखे असायचे. शुक्रवारीसुद्धा ही मंडळी मोहोळसोबतच होती.

### भरदिवसा गोळ्या झाडून हत्या

» कुख्यात डॉन शरद मोहोळच्या पत्नी स्वाती मोहोळ यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. लग्नाच्या वाढदिवसाच्या दिवशी त्याची भरदिवसा गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. कुख्यात गुंड शरद मोहोळ हत्येचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. कुख्यात डॉन शरद मोहोळ यांची दोन दिवसांपूर्वी गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर आता स्वाती मोहोळ यांनी फडणवीसांची भेट घेतली. स्वाती मोहोळ या पुणे भाजपच्या पदाधिकारी आहेत.

## महाराष्ट्रातील महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी

# ‘रिल्स’ नव्हे; रिअल स्टार हवेत!

### तीनही विधानसभा मतदार संघात शरद पवार गटाची मोर्चेबांधणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिलांचे प्रश्न ‘रिल्स’ टाकून सोडवू शकत नाहीत त्यासाठी शरद पवार, सुप्रिया सुळे सारखे ‘रिअल स्टार्स’ बनावे लागते, अशी टीका महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी केली आहे. अजित पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकरणकर यांच्यावर त्यांनी अप्रत्यक्ष टीका केली आहे.**



चिंचवड, भोसरी आणि पिंपरी तीनही विधानसभेमध्ये महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी ताई यांचा झंझावती दौरा झाला. यावेळी युवक शहर अध्यक्ष इम्रान भाई शेख, प्रदेश सरचिटणीस राजन नायर, युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, संदीप चव्हाण, सचिन निंबाळकर, राजेश हरगुडे, विश्रांती पाडाळे, चिंचवड विधानसभा अध्यक्ष स्वप्नाली असोले, भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष सारिका हरगुडे, अश्विनी आगळे, पंचशीला आगळे, सुजाता पाटील नाजुका वाल्हे,हनीफ शेख, रेखा मोरे,अलका खंडागळे, प्राची ससाने, संगीता अवधूते, जयश्री झेंडे, जोशना बैध, आणि मोठ्या संख्येने महिला व युवक पदाधिकारी उपस्थित होते. सांगवीमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेस आयोजित "जागर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा" शिव व्याख्यानाचा कार्यक्रम ठेवण्यात आला. युवक सरचिटणीस मेघराज लोखंडे व ॲडव्होकेट प्रियाताई देशमुख यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. रोहिणी खडसे यांनी खानदेश भागातील शहरात वसलेल्या प्रमुख लोकांच्या देखील गाठीभेटी घेतल्या. शहरात सर्व ठिकाणी ठिकाणी महिला प्रदेशाध्यक्ष यांचे जंगी स्वागत करण्यात आले. आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त महिला शहर अध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली तीनही विधानसभेत कार्यक्रम राबवले गेले.चिखली येथे भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष सारिका हरगुडे यांनी उत्तम कार्यक्रमाचं आयोजन केलं.विविध क्षेत्रांमधील काम करणाऱ्या २०० स्त्रियांना "सन्मान स्त्री शक्तीचा" या कार्यक्रमातून सन्मानित केले. तर सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पिंपरी येथे ज्येष्ठ सामाजिक प्रबोधनकार शारदाताई मुंडे यांचे "जागर सावित्रीच्या लेकींचा" हे व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ‘मी सावित्री बोलते’ हा एक पात्री प्रयोग सादर केला. तसेच अनेक महिलांचा सन्मान देखील करण्यात आले. यावेळी मा उपमहापौर विश्रांतीताई पाडाळे यांना प्रदेश सचिवपदी, तर शोभाताई साठे यांची पिंपरी विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

### ‘मी सावित्री बोलतेचे सादरीकरण...

आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त महिला शहर अध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली तीनही विधानसभेत कार्यक्रम राबवले गेले.चिखली येथे भोसरी विधानसभा कार्याध्यक्ष सारिका हरगुडे यांनी उत्तम कार्यक्रमाचं आयोजन केलं. विविध क्षेत्रांमधील काम करणाऱ्या २०० स्त्रियांना "सन्मान स्त्री शक्तीचा" या कार्यक्रमातून सन्मानित केले. तर सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पिंपरी येथे ज्येष्ठ सामाजिक प्रबोधनकार शारदाताई मुंडे यांचे "जागर सावित्रीच्या लेकींचा" हे व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ‘मी सावित्री बोलते’ हा एक पात्री प्रयोग सादर केला. तसेच अनेक महिलांचा सन्मान देखील करण्यात आले. यावेळी मा उपमहापौर विश्रांतीताई पाडाळे यांना प्रदेश सचिवपदी, तर शोभाताई साठे यांची पिंपरी विधानसभा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

### महिलांना सन्मानाची वागणूक...

रोहिणी खडसे म्हणाल्या की, "राज्यातील महिलांचे प्रश्न सोशल मीडियावर रिल्स टाकून सुटू शकत नाहीत.तर त्यासाठी आधी शरद पवार साहेब,सुप्रिया ताई सारखे लोकांच्या मनातील रिअल स्टार्स बनावे लागते अशी जोरदार टीका विरोधकांवर केली. आगामी लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत महिला काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कसे काम करावे यावर मार्गदर्शन केले. वाढती महागाई,बेरोजगारी,महिलांवर होणाऱ्या वाढत्या अत्याचाराविरोधात विरोधकांना योग्य त्या भाषेत उत्तर देण्यास पुढे मागे बघू नका अश्या सूचना देखील महिला पदाधिकाऱ्यांना दिल्या. तसेच आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पन्नास वर्षांच्या कालखंडात महिला सक्षमीकरण धोरणामुळेच आज महाराष्ट्रात महिलांना सन्मानाने वागणूक मिळत असल्याचे देखील यावेळी सांगितले.यावेळी त्यांनी महिला शहर अध्यक्ष आणि त्यांच्या टीमच्या कामाचे देखील कौतुक केले.

# महिला बचतगटांच्या उत्पन्नांना बाजारपेठ!

### उपआयुक्त अजय चारठाणकर : ‘पवना थडी’मध्ये स्टॉल घेण्याचे आवाहन

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंना उत्तम बाजारपेठ पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून महापालिका उपलब्ध करून देत आहे. उत्पादनांची गुणवत्ता आणि विपणनाचा कौशल्यपूर्ण वापर करण्यावर बचत गटांनी भर द्यावा. महापालिकेने पुढाकार घेतला असून स्टॉल धारक बचतगटांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन उप आयुक्त अजय चारठाणकर यांनी केले.**

महानगरपालिकेच्या वतीने महिला व बाल कल्याण योजनेंतर्गत महापालिका हद्दीतील महिला बचतगटांनी तसेच वैयक्तिक महिलांनी तयार केलेल्या वस्तू उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांना विपणन कौशल्ये ज्ञात व्हावीत, एकूणच महिला उद्योजिका तयार होऊन महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी पवनाथडी जत्रेचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील ११ ते १५ जानेवारी या कालावधीत सांगवी येथील पी. डब्ल्यू. डी मैदान येथे पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंची विक्री व प्रदर्शन करणाऱ्या बचतगटांना पवनाथडी जत्रेतील स्टॉलचे वाटप लकी ड्रॉ पद्धतीने करण्यात आले त्यावेळी चारठाणकर बोलत होते. पवनाथडी जत्रेत महिला बचतगटांना वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या स्टॉल्सची सोडत उप आयुक्त अजय चारठाणकर यांच्या हस्ते लकी ड्रॉ द्वारे महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे काढण्यात आली. यावेळी सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट, विशेष अधिकारी किरण गायकवाड तसेच विविध महिला बचत गटांच्या प्रतिनिधी आणि महापालिका कर्मचारी उपस्थित होते. पवनाथडी जत्रेत वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी स्टॉल उपलब्ध व्हावेत यासाठी बचत गटांच्या प्रतिनिधींनी महापालिकेकडे अर्ज सादर केले होते. त्यानुसार सुमारे ७५० पेक्षा अधिक बचत गटांना लकी ड्रॉद्वारे स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामध्ये दिव्यांग तसेच तृतीयपंथीयांसाठी देखील काही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक आयुक्त श्रीनिवास दांगट यांनी दिली. यावेळी उपस्थित महिला बचत गटांच्या प्रतिनिधींच्या हस्तेही लकी ड्रॉमध्ये असलेल्या चिठ्ठ्यांची निवड करण्यात आली.



> पवनाथडी जत्रेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून महिला बचत गटांच्या उत्पादनांना एक खुले व्यासपीठ महापालिकेच्या वतीने उपलब्ध करून दिले जात आहे. यामुळे महिला बचत गट सक्षम बनत असून त्यांच्या दर्जेदार उत्पादनांना प्रसिद्धीदेखील मिळत आहे.
>
> **- अजय चारठाणकर,** उप आयुक्त. महापालिका.




# कशाला हवेत नगरसेवक?



**महाराष्ट्रात विविध कारणांमुळे निवडणुका लांबल्यामुळे वा लांबणीवर टाकल्यामुळे राज्यातील २७ महानगरपालिका या प्रशासक राजवटीच्या अखत्यारीत आहेत तर जवळपास ३६० नगरपालिका या 'लोकप्रतिनिधी'- मुक्त आहेत . याचा अर्थ वर्तमानात स्थानिक स्वराज्य संस्थांवर थेट राज्य सरकारचे नियंत्रण आहे .**

विरोधी पक्षीय सोयीनुसार आठवण येईल तेव्हा याबद्दल टीका करतात- सामाजिक केंद्र असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थात लोकांचे प्रतिनिधी नसणे हा लोकशाहीचा अप्रत्यक्ष गळा घोटण्याचा प्रकार आहे असे म्हणताना दिसतात . तर सत्ताधाऱ्यांसाठी ही 'चारों उंगलिया असली घी मे' अशी अवस्था असल्याने त्यांचा एकुणातच कल हा निवडणूका टाळण्याकडे दिसतो आहे. स्वतः माजी नगरसेवक मात्र 'अर्थ'पूर्ण मौन बाळगताना दिसतात कारण कायद्यानुसार त्यांचा त्या त्या प्रभागावर अधिकार नसला तरी वर्तमानातील 'सरंजामशाही लोकशाही' पद्धतीनुसार त्यांना अजूनही प्रत्येक कामात पूर्वीप्रमाणेच 'लक्ष्मीदर्शन' होण्यास काही अडथळा येत नाही. यात सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे अगदी तुरळक अपवाद वगळला तर व्हॉट्सअॅप 'विद्यापीठा'त , एकंदर समाजमाध्यमांत 'लोकप्रतिनिधी मुक्त महानगरपालिका व नगरपालिका' विषयी पराकोटीचे मौन दिसते . एरवी कुठल्याही विषयावर 'विचारमंथन' घडवणाऱ्या फेसबुक, ट्विटर आदी समाजमाध्यमांत या विषयी शांतता आहे . उलटपक्षी कधी कधी पोस्ट फिरताना दिसतात त्या लोकप्रतिनिधींच्या अस्तित्वावर व कर्तृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या असतात. त्यांच्या शिवाय देखील कारभार 'चालू'च आहे ना ! नगरसेवक दोन-तीन वर्षे नाहीत म्हणून आम्हाला तरी काही फरक पडलेला नाही . ही जनभावना का निर्माण झाली यावर सर्वच राजकीय पक्ष व त्यांच्या शीर्षस्थ नेत्यांनी व आजी-माजी नगरसेवकांनी 'चिंतन' करणे आवश्यक वाटते . वस्तुतः लोकप्रतिनिधी लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींचे अस्तित्व नसणे हि खरे तर चिंतेची बाब आहे. त्यावर प्रसारमाध्यमातून राजकीय बातम्यांचा दुष्काळ जाणवू लागला की चिंता व्यक्त केली जाते . पण आता केवळ चिंता करून उपयोगाचे नाही तर चिंतन आवश्यक आहे . लोकशाही व्यवस्थेत लोकप्रतिनिधींचे अस्तित्व महत्वाचे आहेच. त्या विषयी दुमत संभवत नाही. पण अनेक नागरिकांची धारणा 'कशाला हवेत नगरसेवक ?' अशी आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. अर्थातच ही टोकाची प्रतिक्रिया असली तरी त्यामागील जनमत जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे . मुळात केवळ नगरसेवक अस्तित्वात असणे म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांत 'लोकशाही व्यवस्था'आहे असे मानणे हाच गैरसमज ठरतो. कारण मूलभूत हा प्रश्न हाही आहे की ग्रामपंचायत ते महानगरपालिकेत जी लोकशाही घटनेला -संविधानाला अपेक्षित होती, त्याची स्वप्नपूर्ती गेल्या ७५ वर्षात तरी झालेली आहे का ? ज्या व्यवस्थेतील सरकारी यंत्रणांचा कारभार जनतेपासून मुक्त ठेवला जातो त्यास खऱ्या अर्थाने लोकशाही असे संबोधणे कितपत रास्त ठरते ? लोकशाही व्यवस्थेत सर्व यंत्रणांचा कारभार हा करदात्या नागरिकांच्या पैशाने चालवला जात असल्याने नागरिक हे ग्रामपंचायत ते महानगर पालिकांचे खरे मालक असतात. पण प्रत्यक्षात या मालकापासुनच लोकशाहीचा अमृत काळ आलेला असला तरी कारभार गुप्त ठेवला जातो आहे. गोपनीय, गुप्त कारभार पद्धती ही भ्रष्टाचाराची जननी आहे हे ज्ञात असून देखील सर्वच राजकीय पक्षाचे नेते व सरकारे जाणीपूर्वक या गोपनीय कारभार पद्धतीचे 'आश्रयदाते' ही भूमिका निभावत आहेत. कुठलेही सरकार असले तरी पारदर्शक कारभार कोणालाच नकोसा आहे. यामुळेच महाराष्ट्रातील जनतेत लोकप्रतिनिधीमुक्त स्थानिक स्वराज्य कारभाराबाबत उदासीनता आहे हे सर्वच राजकीय पक्षांनी, राज्यातील बुद्धिवादी मंडळींनी, विचारवंतांनी लक्षात घ्यायला हवे. यात बदल घडण्यासाठी , लोकांचा लोकशाही यंत्रणांत सहभाग वाढून मतदारांमध्ये लोकशाही विषयी आस्था -प्रेम निर्माण होण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत सर्वच पातळीवर विचार-चर्चा आणि चिंतन होणे अनिवार्य दिसते आहे .

## संपादकीय »

### वर्षांच्या नमनालाच

***अ' हा 'ब'चा शत्रू, 'ब' आणि 'क' यांच्यातील नातेही वैरभावाचे. त्यात 'अ' आणि 'क' यांचेही नाते कटू आणि 'ड' हा या तिघांचाही शत्रू.***

'अ' हा 'ब'चा शत्रू, 'ब' आणि 'क' यांच्यातील नातेही वैरभावाचे. त्यात 'अ' आणि 'क' यांचेही नाते कटू आणि 'ड' हा या तिघांचाही शत्रू. असे काहीसे चित्र आज पश्चिम आशियाच्या आखातात दिसते. तेथील परिस्थिती गेल्या शतकातील साठ-सत्तरच्या दशकाप्रमाणे पुन्हा एकदा कमालीची गुंतागुंतीची होऊ लागली असून इराणमधील ताज्या दहशतवादी हल्ल्याने हा गुंता अधिकच वाढतो. या हल्ल्यात शंभरभर दगावले आणि दोन-एकशे जायबंदी झाले. गेल्या सुमारे पाच दशकांत इराणमध्ये इतका नृशंस दहशतवादी हल्ला झालेला नाही. या दहशतवादी हल्ल्याची जबाबदारी 'आयसिस' या दहशतवादी संघटनेने घेतली; पण इराणच्या मते यामागे इस्रायल आहे. इराणी सत्ताधारी धर्मगुरूच्या क्रांतिकारी सुरक्षा दलाची माध्यमशाखा असलेल्या 'तस्नीम वृत्त सेवा' या अधिकृत यंत्रणेने या संदर्भात इस्रायलवर असा आरोप केला.

**भाजपला सलग तिसऱ्यांदा लोकसभेतला विजय यंदा हवा आहे, त्यापासून भाजपला कोण अडवणार आणि कसे? हा प्रश्न वरवर पाहाता निरुत्तर करणाराच वाटेल. अगदी भाजपच्या विरोधी पक्षांमधले काहीजणसुद्धा, भाजपला अडवणे कठीण असल्याची कबुली खासगीत बोलताना तरी देऊ लागले आहेत! पण मला तसे वाटत नाही.**

# बहुमतपासून भाजपला रोखणे शक्य आहे!

'उरलेल्या तीन महिन्यांत काही तरी चमत्कार' घडेल यावर माझा अजिबात विश्वास नसूनसुद्धा आणि हिंदीपट्ट्यातील तीन राज्यांमध्ये भाजपने अलीकडेच मिळवलेला विजय किती दणदणीत होता, त्या विजयाचे श्रेय मोदींच्या लोकप्रियतेलाच कसे द्यावे लागेल याची पूर्ण कल्पना मला असूनसुद्धा , मला तसे वाटत नाही. अलीकडचा विजय आणि त्याआधीचे सारे विजय हे पुरावे म्हणून मांडायचे आणि त्यातून 'पुढेही भाजप जिंकणारच' असा निकाल द्यायचा, यापेक्षा निराळा विचार जर प्रचाराचा मानसिक पगडा बाजूला सारला तर करता येतो, हे मात्र मला माहीत आहे. निवडणुकांचा शास्त्रीय अंदाज बांधण्याच्या पद्धतीचा महत्त्वाचा भाग म्हणजे जनमताचे कौल, सर्वेक्षणे आणि गणन. सध्या कुठलेही सर्वेक्षण 'इंडिया'आघाडीचा विजय होणार किंवा भाजपचा पराभव होणार असे सांगत नाहीत हे खरे. पण जर विरोधी पक्षांकडे व्यूहरचना असेल आणि कल्पकपणे ती राबवण्याची राजकीय इच्छाशक्तीही



असेल, तर भाजपची दौड २७३ हून कमी जागांवर अडवता येऊ शकते. ही व्यूहरचना किंवा 'रणनीती' २०२४ च्या लोकसभा निवडणुकांत राबवण्यासाठी मुळात 'रणा'चेच तीन भाग ओळखावे लागतील. म्हणजे मतदारसंघांचे तीन प्रकार आहेत, असे मानून तीन्ही प्रकारांत निरनिराळे काम करावे लागेल. सध्या या तीन प्रकारच्या मतदारसंघांना आपण प्राथमिक, दुय्यम आणि तिय्यम मतदारसंघ म्हणू. सुरुवात तिय्यम प्रकारच्या मतदारसंघांपासून करू. ज्या जागांवर भाजपला काही फारसे स्थान नाही, जिथे भाजप उमेदवार तिसऱ्या स्थानावर वा त्याहून खालीच होता, असे हे मतदारसंघ. दक्षिणेकडल्या राज्यांत – केरळ, तमिळनाडू व आंध्र प्रदेशात ते आहेतच आणि आता तर तेलंगणातही दिसून आले आहेत. यात पंजाब, जम्मू-काश्मीर, मिझोरम आणि नागालँड इथलेही मतदारसंघ मोजले तर लोकसभेच्या १२० जागा होतात. या १२० पैकी भाजपकडे फक्त सहा जागा आहेत (पंजाबात चार आणि तेलंगणात दोन). गेल्या पाच वर्षांमध्ये भाजपला या मतदारसंघांच्या क्षेत्रात प्रगती करता आल्याचेही दिसलेले नाही. लोकसभेसाठी जर पंजाबात अकाली दलाशी आणि तेलंगणात 'भारत राष्ट्र समिती'शी उघड अथवा छुपा समझोता नसेल, तर भाजपला गेल्या वेळच्या सहा जागा तरी यंदा टिकवता येणार नाहीत अशी परिस्थिती आहे. याउलट, या सर्व राज्यांमध्ये 'इंडिया' आघाडीतील पक्षांची परिस्थिती चांगली असल्यामुळे, हे पक्ष या राज्यांपुरते अगदी एकेकट लढले तरी चालेल- मात्र असे करतानाही काही विशिष्ट जागा ओळखून तिथे 'इंडिया'ची संघटित ताकद दाखवावी लागेल आणि कदाचित नागरी बिगरपक्षीय संघटनांनाही विश्वासात घ्यावे लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी कारसेवक म्हणून अयोध्येत होतो

## » टीका करणारे त्यावेळी घरात बसून होते : फडणवीस

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव ठाकरे (UDDHAV THACKERAY) आता केवळ वक्तव्य करत आहे. कार सेवेच्या वेळी हे लोक आपापल्या घरात लपून बसले होते. आज हे लोक राजकीय वक्तव्य करत आहेत, त्यांना बोलण्याचा अधिकारही नाही, असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADANVIS) यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. इंडिया टिव्हीला दिलेल्या मुलाखतीमध्ये उद्धव ठाकरे यांनी अयोध्येतील कारसेवेबद्दल भाष्य केलं. तसेच त्यांनी विरोधकांवर देखील निशाणा साधला.**

अयोध्येत रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरू आहे. श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य घटक असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखती दरम्यान म्हटलं. ते म्हणाले की, माझ्या वैयक्तिक आणि राजकीय जीवनात भगवान श्री रामाचे खूप महत्त्व आहे.माझी राजकीय सुरुवात रामाच्या शिलापूजन कार्यक्रमापासून झाली आणि मी कारसेवक म्हणून चळवळीत सहभागी झालो आणि तिन्ही कार सेवेत सहभागी झालो. रामाशी माझे भावनिक नाते आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आपण सर्वजण आदर करतो, असं फडणवीसांनी म्हटलं. हिंदुत्वाची बाजू मांडणारा तो सिंह होता. बाळासाहेब ठाकरे यांना विचारण्यात आले की बाबरी शिवसैनिकांनी पाडली का? तर ते म्हणाले की हो, माझे शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे. पण मी तुम्हाला सांगतो की आम्ही कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते म्हणून तिथे गेलो नाही. आम्ही राम भक्त कारसेवक म्हणून गेलो होतो. उद्धव ठाकरे आणि त्यांचे लोक जे आज विधाने करत आहेत, त्यावेळी तिथे कोणीच नव्हते. सर्वजण घरात गुपचूप बसले होते. आज हे लोक राजकीय वक्तव्य करत आहेत,



त्यांना बोलण्याचा अधिकारही नाही. तिथे कोणीच नव्हते, असं म्हणत फडणवीसांनी उद्धव ठाकरेंवर घणाघात केला. देवेंद्र फडणवीसांनी या मुलाखतीवेळी कारसेवक म्हणून सामील झाल्याचं सांगितलं. यावर त्यांनी म्हटलं की, ऑक्टोबर 1990 च्या पहिल्या कारसेवेत मी नागपूरहून विनातिकीट रेल्वेने गेलो होतो. देवराह बाबांच्या आश्रमात मुक्काम केला. मंदिराच्या छतावर मोकळ्या आकाशात झोपायचे. थंडीचे वातावरण असल्याने शरीर आक्रसले पण आम्ही ठामपणे उभे राहिलो. मग एके दिवशी आम्ही अयोध्येकडे निघालो पण पोलिसांनी आम्हाला एका पुलावर अडवले आणि दोन्ही बाजूंनी गोळ्या झाडल्या जात होत्या. काही कारसेवकांनी नदीत उड्या मारल्या. काही कारसेवकांचाही मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर आम्हाला अटक करण्यात आली, तेथून मला बदायूं तुरुंगात पाठवण्यात आले आणि तेथे मला अनेक दिवस कैदेत ठेवण्यात आले.अयोध्येत रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरू आहे. श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य घटक असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखती दरम्यान म्हटलं. ते म्हणाले की, माझ्या वैयक्तिक आणि राजकीय जीवनात भगवान श्री रामाचे खूप महत्त्व आहे.माझी राजकीय सुरुवात रामाच्या शिलापूजन कार्यक्रमापासून झाली आणि मी कारसेवक म्हणून चळवळीत सहभागी झालो आणि तिन्ही कार सेवेत सहभागी झालो.

### जीवनात श्री रामाचे खूप महत्त्व

» आज हे लोक राजकीय वक्तव्य करत आहेत, त्यांना बोलण्याचा अधिकारही नाही. तिथे कोणीच नव्हते, असं म्हणत फडणवीसांनी उद्धव ठाकरेंवर घणाघात केला. देवेंद्र फडणवीसांनी या मुलाखतीवेळी कारसेवक म्हणून सामील झाल्याचं सांगितलं. यावर त्यांनी म्हटलं की, ऑक्टोबर 1990 च्या पहिल्या कारसेवेत मी नागपूरहून विनातिकीट रेल्वेने गेलो होतो. देवराह बाबांच्या आश्रमात मुक्काम केला. मंदिराच्या छतावर मोकळ्या आकाशात झोपायचे. थंडीचे वातावरण असल्याने शरीर आक्रसले पण आम्ही ठामपणे उभे राहिलो.मग एके दिवशी आम्ही अयोध्येकडे निघालो पण पोलिसांनी आम्हाला एका पुलावर अडवले आणि दोन्ही बाजूंनी गोळ्या झाडल्या जात होत्या. काही कारसेवकांनी नदीत उड्या मारल्या. काही कारसेवकांचाही मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर आम्हाला अटक करण्यात आली, तेथून मला बदायूं तुरुंगात पाठवण्यात आले आणि तेथे मला अनेक दिवस कैदेत ठेवण्यात आले.अयोध्येत रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेची तयारी जोरात सुरू आहे. श्रीराम हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य घटक असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी या मुलाखती दरम्यान म्हटलं. ते म्हणाले की, माझ्या वैयक्तिक आणि राजकीय जीवनात भगवान श्री रामाचे खूप महत्त्व आहे.

रामाशी माझे भावनिक नाते आहे. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा आपण सर्वजण आदर करतो, असं फडणवीसांनी म्हटलं. हिंदुत्वाची बाजू मांडणारा तो सिंह होता. बाळासाहेब ठाकरे यांना विचारण्यात आले की बाबरी शिवसैनिकांनी पाडली का? तर ते म्हणाले की हो, माझे शिवसैनिक असतील तर मला त्यांचा अभिमान आहे. उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray) आता केवळ वक्तव्य करत आहे. कार सेवेच्या वेळी हे लोक आपापल्या घरात लपून बसले होते. आज हे लोक राजकीय वक्तव्य करत आहेत, त्यांना बोलण्याचा अधिकारही नाही, असं म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. उद्धव ठाकरे यांनी अयोध्येतील कारसेवेबद्दल भाष्य केलं.

---

# जागा वाटपावरून महाविकास आघाडीत वाद?


## » कोणताही तिढा शरद पवार सोडवू शकतील : खा. सुप्रिया सुळे

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दक्षिण आणि ईशान्य मुंबईत शिवसेनेचं प्राबल्य आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत जागावाटपासंदर्भात वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध मतदारसंघातून जागा वाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. त्यामुळे या समस्येवर महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीकडून काय निर्णय घेतला जातोय, याकडे सर्वांचं लक्ष आहे. याबाबत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

“वाद झाले असतील तर कोणताही तिढा शरद पवार सोडवू शकतील. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ घेऊन कसं बोलायचं याचे आदर्श शरद पवार आहेत. मग ते वाद कुटुंबातील असो, पक्षातील असो किंवा वाटाघाटी करण्यासंदर्भात वाद असतील. सरकारमध्ये असताना पवारांवर ही जबाबदारी टाकली जायची. त्यामुळे मला याबाबत काही वाटत नाही”, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या पुढे म्हणाल्या, “महिन्याभरात आचारसंहिता लागेल. त्यामुळे सगळेच इच्छुक आहेत. आज प्रत्येक आघाडी इलेक्शन मूडमध्ये आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत पुढच्या आठ



दहा दिवसांत होईल. आमचे प्रवक्ते याबाबत जाहीर सांगतील. दरम्यान, दक्षिण मुंबईत अरविंद सावंत खासदार आहेत. ईशान्य मुंबईतून भाजपाचे मनोज कोटक खासदार आहेत. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघात ठाकरे गट विरुद्ध काँग्रेस यांच्यात वाद सुरू आहे. तर ईशान्य मुंबईबाबतही तिन्ही पक्ष आग्रही आहेत. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातून कोणाला उमेदवारी मिळतेय हे पाहावं लागणार आहे. दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघाची जागा कायम राखण्यासाठी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गट आणि खासदार अरविंद सावंत यांच्या समोर मोठे आव्हान असेल. त्यातच

### कसं बोलायचं याचे आदर्श शरद पवार

» आगामी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत जागावाटपासंदर्भात वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध मतदारसंघातून जागा वाटपाचा तिढा निर्माण झाला आहे. त्यामुळे या समस्येवर महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीकडून काय निर्णय घेतला जातोय, याकडे सर्वांचं लक्ष आहे. याबाबत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ घेऊन कसं बोलायचं याचे आदर्श शरद पवार आहेत.

महाविकास आघाडीत काँग्रेसने मिलिंद देवरा यांच्यासाठी या जागेवर दावा केल्याने विरोधी आघाडीत एकवाक्यता दिसत नाही. दुसरीकडे, भाजपमध्ये विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनाही लोकसभेचे वेध लागल्याने भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळते याची उत्सुकता आहे.आज प्रत्येक आघाडी इलेक्शन मूडमध्ये आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपाबाबत पुढच्या आठ दहा दिवसांत होईल.

# माझ्यासाठी आज नववर्षाची सुरुवात

## न्यायालयाच्या निकालानंतर बिल्कीस बानो यांची प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**बिल्कीस बानो (BILKIS BANI) यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या (SUPREME COURT) आदेशावर आनंद व्यक्त केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर आता बिल्कीस बानोसोबत घृणास्पद कृत्य करणारे आणि तिच्या कुटुंबातील सात जणांची हत्या करणारे 11 दोषी लवकरच तुरुंगात जाणार आहेत. यावर बल्किस बानो यांनी म्हटलं की, आजचा दिवस माझ्यासाठी खरोखर नवीन वर्ष आहे.**




पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, बिल्कीस बानो यांनी त्यांच्या वकिल शोभा गुप्ता यांच्या हवाल्याने म्हटलं की, हे माझ्यासाठी आनंदआश्रू आहेत. मी दीड वर्षांपेक्षा अधिक काळापूर्वी हसले होते. मी माझ्या मुलांना मिठी मारली. माझ्या छातीवरुन डोंगराएवढा मोठा दगड काढल्याचा भास होतो आणि त्यामुळे पुन्हा एकदा श्वास घेऊ शकते. पुढे त्यांनी म्हटलं की, न्याय हा असाच असतो. मला, माझ्या मुलांना आणि स्त्रियांना सर्वत्र समान न्याय दिल्यामुळे मी सर्वोच्च न्यायालयाचे विशेष आभार मानते. बिल्कीस बानो यांनी म्हटलं की, मी जो प्रवास केला तो कधीच एकट्याने केला जाऊ शकत नाही. यामध्ये माझे पती आणि माझी मुले माझ्यासोबत आहेत. माझे मित्र आहेत ज्यांनी द्वेषाच्या काळातही माझ्यावर खूप प्रेम केले आणि प्रत्येक कठीण वळणावर माझा हात धरला. माझ्याकडे एक असाधरण वकील शोभा गुप्ता आहेत. ज्यांनी 20 वर्षांपेक्षा अधिक माझ्यासोबत आहेत. त्यानींच मला न्याय मिळवण्यासाठी प्रेरणा दिली. बिल्कीस बानो म्हणाल्या की, दीड वर्षांपूर्वी 15 ऑगस्ट 2022 रोजी दोषींना लवकरात लवकर सुटका करण्यात आल्याने मी कोलमडून गेले होते. लाखो लोक माझ्यासाठी एकत्र येईपर्यंत माझं सर्व धैर्य मी गमावलं होतं. देशातील हजारो लोक आणि महिला पुढे आल्या, माझ्या पाठीशी उभे राहिले, माझ्या बाजूने बोलले आणि सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. सुप्रीम कोर्टाने सोमवारी (8 जानेवारी) बिल्कीस बानोच्या 11 दोषींना शिक्षेची देण्यात आलेली सूट रद्द केलीये. 2002 मध्ये गुजरात दंगलीच्या वेळी गुन्हेगारांनी हा गुन्हा केला होता. गुजरात सरकारने आपल्या अधिकाराचा गैरवापर केला, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 11 दोषींना दोन आठवड्यांच्या आत तुरुंगात पाठवण्याचे आदेश दिले. मे २००२ मध्ये गुजरातमध्ये घडलेल्या दंगलीत बिल्किस बानो या महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. तिच्या कुटुंबियांचीही हत्या करण्यात आली. याप्रकरणी २००८ साली विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. परंतु, १५ ऑगस्ट २०२२ साली गुजरात सरकारने त्यांची शिक्षा रद्द करून त्यांची सुटका केली. या सुटकेच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन ही शिक्षामाफी रद्दबातल केली आहे. यावर बिल्किस बानोने आता प्रतिक्रिया दिली आहे. या निर्णयामुळे मी आता पुन्हा श्वास घेऊ शकते, अशी प्रतिक्रिया तिने व्यक्त केली. इंडियन एक्स्प्रेसने बिल्किस बानोच्या वकिलांमार्फत संवाद साधला. "आज खरोखरच माझ्यासाठी नवीन वर्ष आहे. माझ्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू आहेत. गेल्या दीड वर्षांत मी पहिल्यांदाच हसले आहे. निकाल लागल्यानंतर मी माझ्या मुलांना मिठी मारली. माझ्या मनावरचं मोठं दडपण दूर झालंय, आता जीव भांड्यात पडला आहे आणि मी मोकळा श्वास घेऊ शकते आहे", या आशयाचं वक्तव्य बिल्किस बानोने केलं. तसंच, "माझ्यासाठी हाच न्याय वाटतो. मला, माझ्या मुलांना आणि स्त्रियांना समान न्याय देण्याच्या वचनाची आशा दिल्याबद्दल मी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानते", असंही बिल्किस बानो म्हणाली.

### माझं धैर्य संपलं होतं, पण...

बिल्किस बानोच्या समर्थनार्थ उभे राहिलेल्यांचेही तिने आभार मानले. ती म्हणाली, "मी आधीही म्हणाले होते आणि आज पुन्हा सांगते, माझ्यासारख्या महिलेचा प्रवास एकट्याने कधीच होऊ शकत नाही. माझे पती आणि माझी मुले माझ्यासोबत आहेत. या द्वेषाच्या काळात मला माझ्या मित्रांनी खूप प्रेम दिलं आणि या कठीण काळात माझ्यासोबत ते उभे राहिले. माझ्याकडे एक अधिवक्ता शोभा गुप्ता या असाधारण वकील आहेत. त्या २० वर्षांहून अधिक काळ माझ्यासोबत राहिल्या. दीड वर्षापूर्वी, १५ ऑगस्ट २०२२ रोजी ज्यांनी माझे कुटुंब उद्ध्वस्त केले होते आणि माझ्या अस्तित्वाला धक्का पोहोचवला होता, त्या आरोपींना सोडून देण्यात आलं होतं.

# शेख हसीना यांचा चौथ्यांदा विजय

## मोदी यांनी फोन करून केले अभिनंदन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा 'ऐतिहासिक' विजय मिळवल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांचे अभिनंदन केले . बांगलादेशमध्ये रविवारी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी बांगलादेशमध्ये केवळ ४० टक्के मतदान झाले. या मतदानाचा निकाल आज लागला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्टमध्ये म्हटलं की, "पंतप्रधान शेख हसिना यांच्याशी बोललो आणि संसदीय निवडणुकीत सलग चौथ्यांदा ऐतिहासिक विजय मिळवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. बांगलादेशातील जनतेचे निवडणुका यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल अभिनंदन केले. आम्ही बांगलादेशसोबत आम्ही लोककेंद्रित भागीदारी आणखी मजबूत करण्यासाठी वचनबद्ध आहोत. बांगलादेशात प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टीने (बीएनपी) रविवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार घातल्यामुळे अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाले. प्राथमिक अंदाजानुसार, दिवसभरात ४० टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पाच वर्षांपूर्वी, २०१८ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली होती. २००९ पासून हसिना शेख बांगलादेशच्या पंतप्रधान आहेत. निवडणुकीपूर्वी बांगलादेशमध्ये हिंसाचार उफाळला होता. त्यामुळे बीएनपी पक्षाने या सार्वत्रिक निवडणुकीवर बहिष्कार घातला होता. बांगलादेश निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, एकूण ३०० मतदारसंघांपैकी २९९ मतदारसंघांमध्ये मतदान झाले. एका मतदारसंघात अवामी लीगच्या उमेदवाराच्या मृत्यूमुळे तिथे मतदान पुढे ढकलण्यात आले आहे. तर, हसिना यांच्या अवामी लीगने सार्वत्रिक निवडणुकीत २२३ जागा जिंकल्या आहेत. जापा या विरोधी पक्षाला ११ जागा आणि सत्ताधारी पक्षाच्या बंडखोरांसह अपक्ष उमेदवारांना ६१ जागा मिळाल्या आहेत. रशिया, चीन, भूतान, फिलीपिन्स, सिंगापूर आणि श्रीलंका या देशांच्या राजदूतांनीही पंतप्रधान शेख हसिना यांची भेट घेतली आणि बांगलादेशला पाठिंबा देण्याचे वचन दिले. विजयानंतर शेख हसीना यांनी सर्वांचे आभार मानले आणि बांगलादेशच्या विकास आणि समृद्धीच्या दिशेने त्यांच्या नवीन सरकारच्या प्रवासात सर्वांचे सहकार्यही मागितले.

# ब्रिजभूषण सिंह यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

अभिनेत्री आणि शिवसेना नेत्या दीपाली सय्यद यांनी ब्रिजभूषण शरण सिंह यांची भेट घेतल्याने आणि त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्याने त्यांच्यावर प्रचंड टीका करण्यात येते आहे. दीपाली सय्यद यांनी त्यांच्या फेसबुक पेजवर भेटीचा फोटो पोस्ट केला आहे. यावरुन दीपाली सय्यद यांना खूप ट्रोल केलं जातं आहे. त्यांच्या या फेसबुक पोस्टवर लोक विविध पद्धतीने व्यक्त होत आहेत.

महिला मल्लांनी ज्या ब्रिजभूषण शरण सिंह यांच्यावर लैंगिक शोषण आणि बलात्काराचे आरोप केले आणि आंदोलन केलं त्यांची भेट तुम्ही कशी काय घेतली असा प्रश्न काही लोकांनी विचारला आहे. दीपाली सय्यद यांनी पोस्ट केलेला फोटो व्हायरल झाला आहे. त्यावरुन त्यांच्यावर चांगलीच टीका होते आहे. आनंद देशमुख नावाचे युजर म्हणतात, 'बलात्काराचे आरोप असणाऱ्या ना लायक माणसाला कसल्या शुभेच्छा देता?', सम्राट३५८ नावाचा युजर म्हणतो, 'एका स्त्रीचा अपमान करणारा माणूस एक स्त्री जवळ कशी करु शकते हा विचार माझ्या मनात आला, राजकारणाची पातळी खालावली अशा लोकांमुळे' असं म्हटलं आहे. 'राक्षसाचे कौतुक कशाला करता?' असं ज्ञानेश्वर इंगळे नावाच्या युजरने म्हटले आहे.

भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचे आरोप केले. या आरोपांनंतर देशभरात एकच खळबळ उडाली. याच आरोपांनंतर न्याय मिळण्यासाठी महिला कुस्तीपटूंनी दिल्लीतल्या जंतरमंतर या ठिकाणी धरणे आंदोलनही केले.

# अन्नपूर्णी सिनेमा वादाच्या भोवऱ्यात!

दाक्षिणात्य सुपरस्टार नयनतारा या अभिनेत्रीचा 'अन्नपूर्णी' हा सिनेमा प्रदर्शित होऊन एक महिना उलटला आहे. मात्र सध्या हा सिनेमा चांगलाच चर्चेत आहे. याचं महत्त्वाचं कारण या सिनेमामुळे निर्माण झालेला वाद. सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर एक महिन्याने धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या सिनेमाच्या निर्मात्यांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे. प्रभू रामचंद्रांबाबत सिनेमात वादग्रस्त वक्तव्य केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. रमेश सोळंकी नावाच्या सोशल मीडिया युझरने एक्स या समाजमाध्यमावर काही पोस्ट केल्या आहेत आणि यामध्ये नेमकं काय म्हणायचं आहे ते मुद्दे मांडले आहे. नयनताराचा अन्नपूर्णी हा सिनेमा हिंदूविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राम मांसाहारी असल्याचा उल्लेख सिनेमात आला असल्याचंही त्याने म्हटलं आहे. एवढंच नाही तर त्याने तक्रार दाखल केली आहे आणि त्याची कॉपीही त्याने पोस्ट केली आहे. मी नेटफ्लिक्सच्या विरोधात माझी तक्रार दाखल केली आहे कारण अन्नपूर्णी या सिनेमात प्रभू रामचंद्रांबाबत वादग्रस्त विधान केलं गेलं आहे. एककीडे भारतात राम मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम जवळ आला आहे. अशात नेटफ्लिक्सने हिंदू विरोधी सिनेमा प्रदर्शित केला आहे असंही या सोळंकीने म्हटलं आहे. वाल्मिकी रामायणातील श्लोकाचा उल्लेख करत अभिनेता अभिनेत्रीला सांगतो की जेव्हा जंगलात असताना म्हणजेच प्रभू राम, सीता आणि लक्ष्मण हे वनवासात गेले होते तेव्हा त्यांनी शिकार करुन मांस शिजवून खाल्लं होतं. रामायणातही लिहिलं आहे रामाने मांस खाल्लं होतं. शंकरानेही मटण खाल्लं होतं असाही उल्लेख पुराणात आहे. असं हा अभिनेता अभिनेत्री नयनताराला सांगतो. हाच प्रसंग पोस्ट करत रमेश सोलंकीने या प्रकरणी पोलिसांकडे आणि देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कारवाईची मागणी केली आहे. या सिनेमाच्या निर्मात्यांकडून याबाबत कुठलंही अधिकृत स्टेटमेंट आलेलं नाही. अन्नपूर्णी हा तमिळ सिनेमा आहे. या सिनेमात नयनतारा मुख्य भूमिकेत आहे. तिच्यासह जय, सत्यराज, कार्तिक कुमार आणि रेणुका हे कलाकराही आहेत.

# सलमानच्या फार्महाऊसमध्ये दोन व्यक्तींचा घुसण्याचा प्रयत्न



बॉलिवूडचा भाईजान सलमान खानच्या (SALMAN KHAN) पनवेल (PANVEL) येथील फार्महाऊसमध्ये दोन अज्ञात व्यक्तींनी घुसण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या पनवेल पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत आहेत. सुरक्षा रक्षकांना संशय आल्यानंतर लगेचच त्यांनी पोलीसांना बोलावून अज्ञान व्यक्तींना त्यांच्या ताब्यात दिलं आहे. अभिनेता सलमान खानच्या पनवेल मधील फार्महाऊसमध्ये बेकायदा घुसण्याचा प्रयत्न झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. फार्महाऊस च्या तारा तोडून आतमध्ये घुसण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन तरुणांना सुरक्षारक्षकांनी पकडून पनवेल पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. या दोघांकडे बनावट आधार कार्ड सापडले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. अजेशकुमार ओमप्रकाश गिल आणि गुरुसेवकसिंह तेजासिंह सीख नामक तरुणांनी सलमान खानच्या पनवेल मधील फार्महाऊसमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला आहे. 4 जानेवारीला सायंकाळी 4 वाजता वाजे गाव येथील अभिनेता सलमान खान याच्या अर्पिता फार्महाऊसमध्ये तारा आणि झाडांच्या कम्पाऊंडमधून घुसण्याचा या दोघांनी प्रयत्न केला होता. सुरक्षारक्षकांनी त्यांना पकडले असता त्यांनी आपली खोटी नावे सांगितली. मात्र सुरक्षा रक्षकांना संशय आल्याने त्यांनी पोलिसांना बोलावून त्यांच्या ताब्यात दिले आहे. याप्रकरणी पनवेल पोलीस अधिक तपास करत आहेत. सलमान खानचं पनवेलला मोठं फार्महाऊस आहे. अनेकदा भाईजान या फार्महाऊसमध्ये येत असतो. याच फार्महाऊसमध्ये आता तो अज्ञान व्यक्तींनी घुसण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन्ही तरुणांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं आहे. सलमान खानचं पनवेल येथील फार्महाऊस नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतं. मुंबईपासून हाकेच्या अंतरावर सलमानचं फार्महाऊस आहे. हे फार्महाऊस भाईजानची बहीण अर्पिताच्या नावावर आहे. या फार्महाऊसमध्ये शेती करतानाचे फोटो सलमानने काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर शेअर केले होते. यात घोडेस्वारीसाठीदेखील जागा राखून ठेवली आहे.

# आयरा-नुपूरच्या लग्नसोहळ्याला

बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानची (AAMIR KHAN) लाडकी लेक आयरा खान (IRA KHAN) आणि नुपूर शिखरे (NUPUR SHIKHARE) पुन्हा एकदा लग्नबंधनात अडकण्यासाठी सज्ज आहेत. 3 जानेवारी 2024 रोजी नोंदणी पद्धतीने लग्न केल्यानंतर आता त्यांचा शाही लग्नसोहळा पार पडणार आहे. आजपासून आयरा-नुपूरच्या लग्नसोहळ्याला सुरुवात झाली आहे. उदयपुर येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये आयरा-नुपूरचा लग्नसोहळा पार पडणार आहे. आयरा-नुपूरचं वेडिंग कार्ड सध्या सोशल मीडियावर चांगलच व्हायरल होत आहे. त्यांच्या हटके वेडिंग कार्डने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या वेडिंग कार्डच्या सुरुवातील 'I & N' असं लिहिलेलं दिसत आहे. तर आतमध्ये 7 ते 10 जानेवारी दरम्यान होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांबद्दल लिहिलेलं दिसत आहे.

# रश्मिका अडकणार लग्नबंधनात



नॅशनल क्रश म्हणून लोकप्रिय झालेल्या रश्मिकाच्या नावाची सध्या मोठी क्रेझ आहे. अल्लु अर्जुनच्या पुष्पामधून ती लाईमलाईटमध्ये आली त्यानंतर मात्र तिच्याकडे वेगवेगळ्या विषयांवरील चित्रपटांची रांगच लागल्याचे दिसून आले. रणबीरच्या ॲनिमलमधूनही ती चाहत्यांच्या कौतुकाचा विषय होती. साऊथ चित्रपटविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणून रश्मिका ही ओळखली जाते. सध्या रश्मिकाच्या लग्नाची जोरदार चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. तिचं नाव प्रसिद्ध अभिनेता विजय देवरकोंडासोबत जोडले जात आहे. त्यांनी भलेही त्यांच्या नात्याची जाहीररित्या कबूली दिली नसली तरी त्यांचं नातं हे चाहते आणि नेटकऱ्यांपासून काही लपून राहिलेलं नाही. अशावेळी त्यांच्या लग्नाच्या बातमीनं मात्र वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. संदीप रेड्डी वांगाचा ॲनिमल जेव्हा प्रदर्शित झाला तेव्हा त्यावरुन मोठा वाद झाला होता. त्यातील रश्मिकाची भूमिका आणि त्याला ज्याप्रकारे चित्रपटामध्ये दाखवण्यात आले त्यावरुन अनेकांनी वेगवेगळे प्रश्नही उपस्थित केले होते. त्यातून महिलांना अपमानित करण्यात आले असून पुरुषप्रधानता हा ॲनिमलचा मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे.प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनी देखील त्यांच्या एका मुलाखतीतून ॲनिमल सारखा चित्रपट एवढा हिट होतो ही आश्चर्याची बाब असल्याचे म्हटले होते. या सगळ्यात मात्र रश्मिकाच्या लग्नाच्या बातमीनं चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जनसत्तानं याबाबत अधिकृतरीत्या माहिती देणारे वृत्त दिले आहे.

# लक्षद्वीप-मालदीव वादात आता कंगणा राणावतनेही घेतली उडी

पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) काही दिवसांपूर्वी लक्षद्वीप दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या या दौऱ्यावर संपूर्ण देशाच्या नजरा होत्या. पीएम मोदींचे लक्षद्वीपमधील (LAKSHADWEEP) फोटो तुफान व्हायरल झाले. त्यानंतर मालदीवमधील (MALDIEVES) नेत्यांनी आणि अधिकाऱ्यांनी पीएम मोदींच्या फोटोवर अपमानित करणाऱ्या कमेंट्स केल्या. दरम्यान आता सोशल मीडियावर लक्षद्वीपच्या समर्थनार्थ अनेक लोक बोलत आहेत. अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी लक्षद्वीपला पाठिंबा दर्शवलाय. यामध्ये कंगणा राणावतही मागे राहिलेली नाही. तिनेही याबाबत प्रतिक्रिया देत पंतप्रधान मोदींना पाठिंबा दर्शवलाय. कंगणा राणावत म्हणाली, "पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) लक्षद्वीपमध्ये (LAKSHADWEEP) पर्यटन



वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मालदीवमधील काही लोक यावर ज्यापद्धतीने व्यक्त होत आहेत, ते चुकीचे आहे. सर्वप्रथम मोदींनी (PM NARENDRA MODI) आपल्या देशाचाच प्रचार केलाय. फक्त लक्षद्वीसाठीच नाही. तर संपूर्ण देशासाठीचं ते काम करतात. ते सर्वांनाच सांगत आहेत की, भारततच विवाह करा. ते भारताला आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे काही मालदीवमधील पर्यटन कमी होणार नाही. कंगणा पुढे बोलताना म्हणाली, "जर लोक काश्मीरला जात असतील. तर याचा अर्थ असा नाही की, मनालीतील पर्यटन कमी होईल. पीएम मोदी अधिकाधिक लोकांना प्रवास करण्यासाठी प्रोत्साहित करत आहेत. यामुळे दुसऱ्या देशांतील पर्यटन कमी होणार नाही. सध्याच्या युगात लोक प्रत्येक ठिकाणी जाऊ इच्छितात. मोदी भारतातील पर्यटन वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. लक्षद्वीपला (LAKSHADWEEP) प्रमोट करत आहेत. याचा अर्थ मालदीव चांगले नाही , असा होत नाही. भारतातील पर्यटनाबाबत कंगणा म्हणाली, मला वाटते की भारत फार सुंदर आहे.

# रोहित-विराट कोहलीचं कमबॅक!

## विराट-रोहितच्या वापसीने हार्दिक पांड्याची पुरती अडचण

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**अफगाणिस्तानविरोधातील टी 20 मालिकेत भारताचे सर्वात अनुभवी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचं टीम इंडियात कमबॅक झालेय. या दोघांच्या कमबॅकनंतर चाहत्यांच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित झाले. 14 महिन्यानंतर विराट आणि रोहित यांनी टी 20 मध्ये कमबॅक का केलं? निवड समितीला हा निर्णय का घ्यावा लागला? यासारखे प्रश्न चाहत्यांच्या मनात काहूर माजत असतील. टी 20 विश्वचषकाआधी निवड समितीने अनुभवी रोहित आणि विराट कोहली यांच्यावर पुन्हा एकदा का विश्वास दाखवला? हे समजणं तितकेही अवघड नाही.**




मर्यादीत क्रिकेट स्पर्धेत विराट कोहली आणि रोहित शर्मा जगातील सर्वात शानदार फलंदाजांपैकी आहेत. रेकॉर्ड्स पाहिलं तर सध्याचा एकही खेळाडू त्यांच्या आसपासही नाही. रोहित आणि विराट या दोन्ही दिग्गज खेळाडूंचा अलीकडचा फॉर्म पाहता त्यांच्या निवडीकडे दुर्लक्ष करणे निवड समितीला शक्य नव्हते. रोहित शर्माने एकदिवसीय विश्वचषकातील जवळपास प्रत्येक सामन्यात संघाला विस्फोटक सुरुवात करून दिली. रोहितने स्ट्राइक रेटबाबत विचारलेल्या प्रश्नांना त्याच्या विश्वचषकातील कामगिरीसह उत्तरेही दिली. विराट कोहलीनेही जवळपास प्रत्येक सामन्यात शानदार फलंदाजी केली आणि अँकरच्या भूमिकेत अप्रतिम कामगिरी केली. त्यामुळे विराट कोहलीचा दावाही बळकट आहे. हार्दिक पांड्या आणि सूर्यकुमार यादव यांची दुखापत रोहित आणि विराट या जोडीच्या पथ्यावर पडली. हार्दिक पांड्या आणि सूर्यकुमार यादव यांच्या अनुपस्थितीत भारतीय संघाची बॅटिंग ऑर्डरमध्ये अनुभव कमी दिसत होता. त्याशिवाय नेतृत्व म्हणून अन्य एकही खेळाडू अद्याप तयार झालेला नाही. हार्दिक आणि सूर्याच्या अनुपस्थितीत नेतृत्वाची जागा भरुन काढण्यात रोहित शर्माशिवाय दुसरा कोणताही पर्याय दिसत नाही. नुकत्याच झालेल्या विश्वचषकात रोहित शर्माच्या नेतृत्वाचं सर्वांनीच कौतुक केले. त्याशिवाय ड्रेसिंग रुममधील वातावरणही सकारात्मक होतं. दुसरीकडे विराट कोहलीकडे परिस्थितीनुसार खेळण्याची क्षमता आहे. विराट कोहली कोणत्याही क्षणाला आपला खेळ बदलू शकतो. मागील टी 20 वर्ल्डकपमध्ये विराट कोहली भारताचा बेस्ट फलंदाज होता. या सर्व कारणामुळे रोहित आणि विराट कोहली यांचं टी 20 मध्ये कमबॅक झालेय. दरम्यान, हार्दिक पांड्याला टी-20 फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचा कर्णधार बनवण्यात आलं होतं, तर सूर्यकुमार यादवला उपकर्णधार बनवण्यात आलं होतं. असे मानले जात होते की संघ आता रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यापेक्षा कमीत कमी टी-20 फॉरमॅटमध्ये पुढे गेला आहे. या दोघांना वगळण्याचे एक कारण म्हणजे दोन्ही विश्वचषकातील खराब कामगिरीसाठी टॉप ऑर्डरला जबाबदार धरण्यात आले. टॉप 3 मध्ये रोहित शर्मा, केएल राहुल आणि विराट कोहली यांच्या उपस्थितीमुळे संघाला या फॉरमॅटमध्ये अपेक्षित सुरुवात होत नव्हती. रोहित शर्मा टी-20 फॉरमॅटमध्ये फलंदाजी करत नव्हता, तर विराट कोहली आणि केएल राहुल यांच्या स्ट्राइक रेटवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मर्यादीत क्रिकेट स्पर्धेत विराट कोहली आणि रोहित शर्मा जगातील सर्वात शानदार फलंदाजांपैकी आहेत. रेकॉर्ड्स पाहिलं तर सध्याचा एकही खेळाडू त्यांच्या आसपासही नाही. रोहित आणि विराट या दोन्ही दिग्गज खेळाडूंचा अलीकडचा फॉर्म पाहता त्यांच्या निवडीकडे दुर्लक्ष करणे निवड समितीला शक्य नव्हते. रोहित शर्माने एकदिवसीय विश्वचषकातील जवळपास प्रत्येक सामन्यात संघाला विस्फोटक सुरुवात करून दिली. रोहितने स्ट्राइक रेटबाबत विचारलेल्या प्रश्नांना त्याच्या विश्वचषकातील कामगिरीसह उत्तरेही दिली.

### चाहत्यांच्या मनात काहूर

» विराट कोहलीनेही जवळपास प्रत्येक सामन्यात शानदार फलंदाजी केली आणि अँकरच्या भूमिकेत अप्रतिम कामगिरी केली. त्यामुळे विराट कोहलीचा दावाही बळकट आहे. अफगाणिस्तानविरोधातील टी 20 मालिकेत भारताचे सर्वात अनुभवी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचं टीम इंडियात कमबॅक झालेय. या दोघांच्या कमबॅकनंतर चाहत्यांच्या मनात अनेक प्रश्न उपस्थित झाले. 14 महिन्यानंतर विराट आणि रोहित यांनी टी 20 मध्ये कमबॅक का केलं? निवड समितीला हा निर्णय का घ्यावा लागला? यासारखे प्रश्न चाहत्यांच्या मनात काहूर माजत असतील. टी 20 विश्वचषकाआधी निवड समितीने अनुभवी रोहित आणि विराट कोहली यांच्यावर पुन्हा एकदा का विश्वास दाखवला? हे समजणं तितकेही अवघड नाही. मर्यादीत क्रिकेट स्पर्धेत विराट कोहली आणि रोहित शर्मा जगातील सर्वात शानदार फलंदाजांपैकी आहेत. रोहित आणि विराट या दोन्ही दिग्गज खेळाडूंचा अलीकडचा फॉर्म पाहता त्यांच्या निवडीकडे दुर्लक्ष करणे निवड समितीला शक्य नव्हते.

# शमी, सूर्यकुमार इंग्लंड कसोटी मालिकेतून बाहेर?

## 25 जानेवारीपासून 5 सामन्यांची मालिका होत आहे सुरु

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला जानेवारी महिन्याच्या २५ तारखेपासून सुरुवात होत आहे. पहिली कसोटी हैदराबादमध्ये खेळली जाणार आहे, त्यासाठी इंग्लंड पुढील आठवड्यात युएई (संयुक्त अरब अमिराती) मार्गे भारतात पोहोचेल. भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या दुखापतीबाबत एक अपडेट समोर आले आहे.**

तो पहिल्या दोन कसोटी सामन्यांमधून बाहेर असू शकतो. विश्वचषकादरम्यान मोहम्मद शमीला दुखापत झाली होती, त्यानंतर त्याचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी संघात समावेश करण्यात आला होता मात्र, दुखापतीमुळे तो बाहेर पडला होता. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, शमीने अद्याप गोलंदाजीला सुरुवातही केलेली नाही, तो इंग्लंडविरुद्धचे पहिले दोन कसोटी सामन्यातून बाहेर पडू शकतो. बीसीसीआयने याबाबत कुठलीही अधिकृत माहिती दिलेली नाही. बोर्डाच्या एका अधिकाऱ्याच्या







हवाल्याने अहवालात म्हटले आहे की, "मोहम्मद शमीने अद्याप गोलंदाजी सुरू केलेली नाही. शमीला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत (एनसीए) जाऊन फिटनेस सिद्ध करावा लागणार आहे. इंग्लिश संघाविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांमध्ये त्याचे खेळणे संशयास्पद वाटत आहे. दुसरीकडे, सूर्यकुमार यादवच्या बाबतीत अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागेल. हर्नियाच्या ऑपरेशननंतर प्रशिक्षण सुरू करण्यासाठी त्याला आठ-नऊ आठवडे लागू शकतात. आशा आहे की तो आयपीएल दरम्यान तंदुरुस्त होईल." मोहम्मद शमीच्या घोट्याला दुखापत झाली होती, त्याची दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटींच्या मालिकेसाठी निवड झाली होती परंतु, बीसीसीआयने नंतर अधिकृत माहिती दिली की त्याचे खेळणे वैद्यकीय संघाच्या मान्यतेवर अवलंबून असून त्यांनी मान्यता दिली नाही. वृत्तानुसार, बीसीसीआय मोहम्मद शमीच्या पुनरागमनाची घाई करणार नाही कारण जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराजसारखे वेगवान गोलंदाज पाच सामन्यांच्या मायदेशातील कसोटी मालिकेत उपलब्ध असतील.

### जोहान्सबर्गमध्ये सूर्यकुमार जखमी

» डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेतील टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत भारताचे नेतृत्व करणाऱ्या सूर्यकुमारला, जोहान्सबर्गमधील तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात क्षेत्ररक्षण करताना घोट्याला दुखापत झाली होती. नुकतीच त्याच्या घोट्यावर शस्त्रक्रिया झाली असून काही महिन्यांत तो पुन्हा प्रशिक्षण शिबिरात परतण्याची शक्यता आहे.